महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

वाणिज्य विभाग, प्रकाशगड- ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

फोन (वै)२६४४७७५३ (का)२६४७४२११, फॅक्स २६४७४३६६

क्र.मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.प.दिवाबत्ती/५५/२००५-२००६/१५९१ दिनांक: १९/०१/२००५

## परिपत्रक क्र. १८

**विषय:** ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २००५-२००६ या आर्थिक वर्षासाठी दिलेल्या अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. दहा कोटी तीस लक्ष फक्त.

**संदर्भ:** शासन निर्णय क्र.वीजीटी २६०५/प्र.क्र.४०४२/पंरा-४(२२) दिनांक २०डिसेंबर ,२००५.

-------------------------

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची देयके भागविण्यासाठी शासन १०० टक्के अनुदान देते सन २००५ -०६ या आर्थिक वर्षासाठी तरतुद केलेली अर्थसंकल्पीय रक्कम रु.१०,३०,००,०००/- (रु. दहा कोटी तीस लक्ष फक्त) शासन निर्णय क्र. बीजीटी २६०५/प्र.क्र.४०४२/पंरा-४ (२२) दिनांक २० डिसेंबर २००५ सोबत जोडलेल्या जिल्हा निहाय विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे , महाराष्ट्र शासनाकडून पुस्तकी समायोजनेव्दारे मंडळास रक्कम प्राप्त झाली आहे.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे संबंधीत जिल्हातील ग्रामपंचायतीच्या नांवाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधीतांनी जरुरती कार्यवाही करावी.

थकबाकी पोटी समायोजित करण्यात आलेल्या रक्कमेचे, ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ,मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग , मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरीत पाठवावी.

सहपत्र: वरीलप्रमाणे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सस्नेह रवाना :**

१)सर्व मुख्य अभियंता , म.रा.वि.वि.कं.मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालय,
माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

प्रत रवाना :१)सर्व अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्यादित, संवसु मंडळ कार्यालय,
२)सर्व कार्यकारी अभियंता, व उप कार्यकारी अभियंता ,म.रा.वि.वि.कं.मर्यादित, संवसु विभागीय कार्यालय
३)सर्व सहाय्यक अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्यादित,संवसु उपविभागीय कार्यालय,
- उचित कार्यवाहीसाठी.

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com